महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ❖१८ जुलै २०२५ ❖वर्ष - सातवे ❖अंक ०२७ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024





## स्वच्छ सर्वेक्षणात मिरा भाईंदर मनपा देशात प्रथम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : स्वच्छ भारत मिशन-शहरी अंतर्गत आयोजित 'स्वच्छ सर्वेक्षण 2024-25' मध्ये महाराष्ट्राने पुन्हा एकदा देशात आपले वर्चस्व सिद्ध केले असून राज्याला एकूण दहा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यंदाच्या सर्वेक्षणात मिरा भाईंदर महानगरपालिकेने देशात सर्वप्रथम क्रमांक पटकावत राज्याचा नावलौकिक वाढविला आहे.



नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते या राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी केंद्रीय गृहनिर्माण नगर विकास मंत्री मनोहर लाल आणि राज्यमंत्री तोखन साहू यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्याच्या नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, प्रधान सचिव नगरविकास विभाग-2 डॉ. के.एच. गोविंदराज, राज्य मिशन डायरेक्टर स्वच्छ महाराष्ट्र शहरी नवनाथ वाठ उपस्थित होते.

स्वच्छ शहरांच्या मूल्यांकनामध्ये (ठाणे जिल्हा) मिरा भाईंदर महानगर पालिकेने 3 ते 10 लाख लोकसंख्येच्या गटात देशात अव्वल स्थान मिळवले आहे. हा पुरस्कार माननीय राज्यमंत्री यांच्यासह महानगरपालिकेचे आयुक्त राधा बीनोद शर्मा त्यांच्या सहकार्यासह स्वीकारले.

10 लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या गटात (ठाणे जिल्हा) नवी मुंबई महानगरपालिकेने "सुपर स्वच्छ लीग सिटी" पुरस्कार पटकावला आहे पुरस्कार राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांच्यासह आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

महाराष्ट्राने कचरा व्यवस्थापन, स्रोत पातळीवरील विलगीकरण, नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून स्वच्छतेच्या दिशेने उल्लेखनीय कार्य केले आहे. मिरा भाईंदरने अत्याधुनिक कचरा व्यवस्थापन प्रणाली, मशीनद्वारे कचरा संकलन आणि नागरिकांमध्ये जनजागृती घडवून हे यश संपादन केले.

2016 पासून सुरू झालेला स्वच्छ सर्वेक्षण उपक्रम केंद्र शासनान सुरू केले आहे. शहरी स्वच्छतेचा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ बनला आहे. अंतर्गत महाराष्ट्रातील विविध शहरांनी दाखवलेली कामगिरी संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी ठरत असून, स्वच्छतेच्या दिशेने ही वाटचाल भविष्यातही वेगाने सुरू राहील, अशी अपेक्षा राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांनी यावेळी व्यक्त केल्या.

## विधानभवनात फ्री स्टाईल हाणामारी

### मला अतीव दुःख आहे राड्यानंतर पडळकरांकडून दिलगिरी

### मुख्यमंत्री 'ॲक्शन मोड'वर, विधानसभा अध्यक्षांचीही घेतली भेट



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : विधानभवन परिसरात घडलेल्या राड्यानंतर आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंद पडळकर यांना महसूलमंत्री आणि भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी बोलावून घेतले होते. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी दोन्ही आमदारांना एकत्र बोलावून त्यांच्यासोबत चर्चा केल्यानंतर आमदारांनी पत्रकारांना प्रतिक्रिया दिली आहे. गोपीचंद पडळकर यांनी घडल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे. विधानसभेच्या प्रांगणामध्ये जी घटना घडलेली आहे, ती अत्यंत दुर्दैवी आहे. याचं अतीव दुःख मला आहे, सगळ्या प्रकाराबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो, असे गोपीचंद पडळकर यांनी म्हटलं आहे. पडळकर यांनी याबाबत अधिक बोलणे टाळले, तसेच माझ्या वरिष्ठ नेत्यांसोबत चर्चा केल्यानंतर मी अधिक प्रतिक्रिया देईन, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### नेमकं काय घडलं?

विधानभवनाच्या पायऱ्या चढून वर गेल्यावर मुख्य प्रवेशद्वाराजवळ आमदार गोपीचंद पडळकरांचे कार्यकर्ते हृषिकेश टकले आणि आमदार जितेंद्र आव्हाडांचे मुख्य कार्यकर्ते नितिन देशमुख यांच्यात तूफान हाणामारी झाली. गंभीर गोष्ट अशी की स्वतः आमदार गोपिचंद पडळकर तिथे उपस्थित होते. यादरम्यान विधानसभेत जितेंद्र आव्हाड काल विधिमंडळाच्या दारावर झालेल्या शिवीगाळ बद्दल बोलत होते. या घटनेनंतर आमदार रोहित पवारांनी घडलेल्या घटनेची माहिती विधानसभेत दिली. हाच सगळा प्रकार सना मलिक यांनीही विधानसभेत सांगितला आणि त्यामुळे आपण बाहेर जात असताना, पुन्हा सभागृहात परतल्याचं त्यांनी म्हटलं. यादरम्यान जितेंद्र आव्हाड बाहेर आले आणि मिडिया स्टँडवर त्यांनी माध्यमांना बाईट दिला. याचवेळी विधीमंडळात आशिष शेलारांनी सगळी घटना सविस्तर सांगितली. त्यावर अध्यक्षांनी रिपोर्ट मागवला आहे. जितेंद्र आव्हाड आत येऊन पुन्हा चिडून बोलले, त्यावर अध्यक्षांनी पुन्हा एकदा रिपोर्ट मागितला. हे सगळं होत असताना गोपीचंद पडळकरांनी विधिमंडळ परिसरातून काढता पाय घेतला होता.

### पडळकरांनी मागितली माफी

या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पडळकरांना बोलावून घेतले. दरम्यान दोघांनाही सुरक्षा रक्षकांनी ताब्यात घेतलं आणि दोघांचेही जबाब नोंदवून घेतले. त्यानंतर जयंत पाटील अणि जितेंद्र आव्हाड मुख्यमंत्र्यांना भेटायला गेले आणि त्यांना सगळ्या घटनेची माहिती दिली. हे सगळं घडत असताना पडळकर विधिमंडळात परतले आणि बावनकुळेंना भेटायला गेलेय. गोपीचंद पडळकर आणि चंद्रशेखर बावनकुळे यांची बैठक 10 मिनिटांत संपली आणि पडळकरांनी बाहेर येऊन दिलगिरी व्यक्त केली आणि विधीमंडळातून ते निघून गेले

### जितेंद्र आव्हाडांकडून संताप व्यक्त

विधानसभेत जर तुम्ही गुंडांना प्रवेश देणार असाल आणि ते हल्ले करणार असतील तर आमचे जीव सुरक्षित नाहीत. मला आई बहिणीवरुन शिव्या दिल्या आहेत. कुत्रा, डुक्कर अजून काय काय लिहिलं आहे. भाषण करुन बाहेर आलो होतो, मोकळी हवा खाण्यासाठी बाहेर गेलो होतो. हे सगळे मलाच मारण्यासाठी आले होते.विधानसभेत विधिमंडळाच्या पायऱ्यांवर, भवनात आमदार सुरक्षित नसतील तर कशाला राहायचं आमदार? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला. तसेच, काय गुन्हा आहे आमचा, कुणीतरी मवाल्यासारखा येतो, आई बहिणींवरुन शिव्या देतो, त्याला पार्लमेंटरी शब्द करुन टाका, अनपार्लमेंटरी शब्द वापरतात, ते पार्लमेंटरी करुन टाका, सत्तेचा एवढा मुजोरपणा, सत्तेचा एवढा माज असे म्हणत आव्हाड यांनी संताप व्यक्त केला.





कल्याण डोंबिवली महापालिकेचे उपायुक्त श्री संजय जाधव व कुणबी समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते श्री मनोज आंबेकर यांनी बाजार समितीचे सभापती रवींद्र घोडविंदे यांचा सत्कारं करून शुभेच्छा दिल्या.

## खाजगी कोचिंग क्लासेससाठी लवकरच कायदा

### – शिक्षणमंत्री दादा भुसे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : महाविद्यालये आणि खासगी कोचिंग क्लासेस यांच्यातील भ्रष्ट युती मोडून काढण्यासाठी महाराष्ट्र सरकार लवकरच एक कायदा आणणार आहे, असे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी बुधवारी सांगितले.

खासगी कोचिंग क्लासेसना मुख्य शैक्षणिक जबाबदाऱ्या न देता, महाविद्यालये आपले काम स्वतंत्रपणे करतील, याची खात्री करून महाविद्यालयांना आपल्या जबाबदारीची जाणीव करून देणारा हा कायदा असेल. खासगी कोचिंग क्लासेसशी समन्वय साधून चालणाऱ्या महाविद्यालयांच्या पद्धतीला आळा घालण्यासाठी सरकार लवकरच एक कायदा आणेल, असेही दादा भुसे म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार हिरामण खोसकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर त्यांनी विधानसभेत उत्तर दिले. काहीही न शिकवता शाळा, महाविद्यालयांकडून अतिरिक्त शुल्क वसूल केले जात आहे. मात्र, त्यात पारदर्शकता आणण्यासाठी आणि पालकांचे आर्थिक शोषण रोखण्यासाठी सरकार या नियमांमध्ये सुधारणा करेल, असेही त्यांनी सांगितले.

### मुंबईत ४२० अनधिकृत शाळा

मुंबईत ४२० अनधिकृत शाळा आढळल्या असून त्यापैकी ४७ शाळा बंद करण्यात आल्या आहेत, अशी माहितीही भुसे यांनी सभागृहाला दिली. शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी विधान परिषदेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दादा भुसे म्हणाले की, "मुंबईत अनुदानित तसेच विनाअनुदानित १,०५७ शाळा सुरू आहेत. ४२० अनधिकृत शाळांपैकी १०३ शाळांना दंड ठोठावण्यात आला असून १२६ शाळांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. १,०५७ पैकी २१८ शाळांनी २०२२नंतर परवानगीच्या नूतनीकरणासाठी अर्ज केलेला नाही. २१८ शाळांपैकी २११ शाळांना शिक्षणाच्या अधिकाराखाली परवानगी मंजूर करण्यात आली असून सात शाळा बंद करण्यात आल्या आहेत."

## मुरबाड तालुक्यातील वाल्हीवरे आश्रम शाळेवर प्रशासक

### आ. किसन कथोरे यांची विधानसभेत लक्षवेधी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूरः मुरबाड तालुक्यातील वाल्हीवरे येथे असलेल्या शासकीय अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत शिकणाऱ्या एका दहावीच्या विद्यार्थ्याने शाळेजवळच्या जंगलात जाऊन गळफास लावून आत्महत्या केली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. मात्र या शाळेवर प्रशासक नेमूण कठोर कारवाई करावी या मागणीसाठी हा प्रश्न लक्षवेधीच्या स्वरूपात मुरबाडचे आमदार किसन कथोरे यांनी विधानसभेत मांडला. त्यावर बोलताना आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी संबंधित शाळेवर तीन महिने प्रशासक नेमण्याची घोषणा केली आहे. प्रशासक काळाता चौकशी करून अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्याचेही आश्वासन यावेळी मंत्री उईके यांनी दिली.



मुरबाडपासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या वाल्हिवरे गावात लोकसेवा शिक्षण संस्थेची प्राथमिक आणि माध्यमिक शासकीय अनुदानित आदिवासी आश्रमशाळा आहे. या शाळेत शिकणाऱ्या इयत्ता दहावीतील सुभाष रावते याने १ फेब्रुवारी २०२५ रोजी शाळेच्या मागे असलेल्या जंगलात जाऊन झाडाला दोरीने बांधून गळफास घेत आत्महत्या केली होती. याप्रकरणी टोकावडे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. विद्यार्थ्याच्या आत्महत्येप्रकरणी शाळेचे प्राथमिक, माध्यमिक मुख्याध्यापक, वर्गशिक्षक आणि अधिक्षक यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती.

मात्र या शाळेबाबत अनेक तक्रारी असल्याचे सांगत मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी हा प्रश्न पावसाळी अधिवेशनात लक्षवेधीच्या स्वरूपात मांडला. विद्यार्थ्याच्या सुरक्षेची जबाबदारी ही शाळा प्रशासनाची होती. शाळेबाबत असंख्य तक्रारी आहेत, असे यावेळी किसन कथोरे म्हणाले. या शाळेमध्ये स्थानिक विद्यार्थी नाहीत. त्यामुळे बाहेरून विद्यार्थी आणून अनुदान लाटण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही यावेळी आमदार कथोरे यांनी केला. या आश्रमशाळेवर कठोर कारवाई करत प्रशासक नेमला जाईल का, असा प्रश्न यावेळी कथोरे यांनी उपस्थित केला. त्यावर बोलताना आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी उत्तर देताना या आश्रमशाळेवर तीन महिन्यांसाठी प्रशासक नेमण्याची घोषणा मंत्री उईके यांनी केली. या काळात चौकशी करून अहवाल सादर झाल्यानंतर कारवाई केली जाईल, अशीही माहिती मंत्र्यांनी यावेळी बोलताना दिली.










# गीतासार



### अध्याय १७
### श्रद्धात्रयविभागयोगः

ॐ श्रीपरमात्मने नमः
अर्जुन उवाच ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः । तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः ॥ १७-१ ॥

अर्जुन म्हणाला, हे श्रीकृष्णा, जी माणसे शास्त्रविधीला सोडून श्रद्धेने युक्त होऊन देवादिकांचे पूजन करतात, त्यांची मग स्थिती कोणती? सात्त्विक, राजस की तामस? ॥ १७-१ ॥

श्रीभगवानुवाच त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा । सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ॥ १७-२ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, मनुष्यांची ती शास्त्रीय संस्कार नसलेली, केवळ स्वभावतः उत्पन्न झालेली श्रद्धा सात्त्विक, राजस व तामस अशा तीन प्रकारचीच असते. ती तू माझ्याकडून ऐक. ॥ १७-२ ॥

सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत । श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥ १७-३ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), सर्व माणसांची श्रद्धा त्यांच्या अंतःकरणानुरूप असते. हा पुरुष श्रद्धामय आहे. म्हणून जो पुरुष ज्या श्रद्धेने युक्त आहे, तो स्वतःही तोच आहे (अर्थात त्या श्रद्धेनुसार त्याचे स्वरूप असते). ॥ १७-३ ॥

## रेसिपी
## कांदा कचोरी



**साहित्य-**
मैदा -दोन कप,ओवा -अर्धा टीस्पून ,तेल -१/४ कप,पाणी ,कांदा -दोन बारीक चिरलेले ,बेसन -दोन टेबलस्पून,आले-लसूण पेस्ट -एक टीस्पून,हिरवी मिरची तुकडे, हिंग ,धणे पूड- अर्धा टेबलस्पून,बडीशेप -एक टीस्पून,जिरे- एक टीस्पून, हळद -अर्धा टीस्पून, तिखट- अर्धा टीस्पून ,आमसूल पावडर- अर्धा टीस्पून, गरम मसाला -अर्धा टीस्पून ,कोथिंबीर ,तेल-दोन टेबलस्पून

**कृती-**
एका भांड्यात पीठ, मीठ आणि ओवा मिसळा. नंतर तेल किंवा तूप (मोहन ) घालून चांगले मिक्स करा. आता घट्ट होईपर्यंत मळा. थोडे थोडे पाणी घालून मऊ आणि गुळगुळीत पीठ मळून घ्या. पीठ झाकून ठेवा आणि अर्धा तास बाजूला ठेवा. त्यानंतर, एका पॅनमध्ये दोन टेबलस्पून तेल गरम करा. हिंग, जिरे आणि बडीशेप घाला आणि काही सेकंद परतून घ्या. बारीक चिरलेला कांदा आणि हिरव्या मिरच्या घाला आणि सोनेरी होईपर्यंत परतून घ्या. आले-लसूण पेस्ट घाला आणि आणखी एक मिनिट परतून घ्या. आता बेसन घाला आणि मंद आचेवर दोन मिनिटे सतत परतवत राहा, बेसनातून सुगंध येईपर्यंत परतून घ्या. धणे पूड, हळद पावडर, लाल तिखट, सुक्या आंब्याची पावडर, गरम मसाला आणि मीठ घाला आणि चांगले मिक्स करा. आणखी दोन मिनिटे परतून घ्या. गॅस बंद करा आणि कोथिंबीर घाला आणि मिक्स करा. यानंतर, स्टफिंग थंड होऊ द्या. मग पिठाच्या गोळ्यात स्टफिंग भरून पुरीएवढं लाटून तळा. कचोरी तयार

### डोंबिवलीतील ६५ इमारतींसंदर्भात
# उद्योगमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक
## रहिवाशांना दिलासा देणारा निर्णय..

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : आझाद मैदान येथे १५ जुलै रोजी येथे झालेल्या ६५ इमारतींच्या धरणे आंदोलनानंतर १६ जुलै रोजी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीसाठी नगर विकास विभागाचे मुख्य सचिव असीम गुप्ता, तसेच कल्याण-डोंबिवली महापालिकेचे कर्तव्यदक्ष आयुक्त अभिनव गोयल हे स्वतः उपस्थित होते. कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, तसेच ६५ इमारतीमधील प्रतिनिधी देखील या चर्चेत सहभागी झाले.

#या बैठकीत खालील निर्णय घेण्यात आले:

१) ६५ इमारती ज्या भूखंडांवर उभ्या आहेत.त्या जमिनींचा मालकी हक्क संबंधित सोसायट्यांना देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला.



२) वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्यासाठी शासन सकारात्मक असून, या प्रक्रियेसाठी रहिवाशांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

३) विकास आराखडा मधील आरक्षित भूखंडांपैकी डिपी रोड वगळता इतर आरक्षणे काढण्यासाठी शासन धोरणात्मक निर्णय घेईल.

या विशेष निर्णयामुळे ६५ इमारतीतील हजारो रहिवाशांना दिलासा मिळणार असून,शासन त्यांच्या बाजूने असल्याने घर वाचवण्याच्या लढ्याला बळ मिळालं आहे.

उबाठाचे जिल्हा प्रमुख दीपेश पुंडलीक म्हात्रे, या बैठकीतील सकारात्मक भूमिकेसाठी उदय सामंत यांचे व यूडी विभागाचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. या लढ्याला यश मिळवून देण्यासाठी त्यांनी तातडीने पुढाकार घेतला, यासाठी संपूर्ण रहिवाशांच्या वतीने दीपेश म्हात्रे यांनी विशेष आभार व्यक्त केले.

सर्व रहिवाशांना आवाहन करण्यात आले आहे की, सदर इमारतीमधील रहिवाश्यांनी आपली कागदपत्रे एकत्र करून लवकरात लवकर शासनाकडे सादर करावीत, जेणेकरून ही प्रक्रिया वेगाने पूर्ण होईल. हा लढा केवळ थांबवण्याचा नाही, तर घरे वाचवण्याचा आणि न्याय मिळवण्याचा आहे. एकजुटीने आपण निश्चितच यशस्वी होऊ असा विश्वास दीपेश पुंडलीक म्हात्रे यांनी व्यक्त केला आहे.

# बर्फाचे गोळे विकणारा झाला शेतीनिष्ठ शेतकरी

- राजधानी दिल्लीत मिळाला ध्वजारोहण उपस्थितीचा मान
- कोसले गावाला मिळवून दिला देशात'बहुमान!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : उन्हाळयात गावोगावी, खडोपाड्यात जाऊन, बर्फाचे गोळे विकून आपल्या कुंटूबाचा उदरनिर्वाह करणारा एक सर्वसामान्य माणूस, शेतीत अमुलाग्र बदल करण्यासाठी जिवाचं रान करतो, जिद्द, चिकाटी, अपार कष्ट करण्याची तयारी, प्रबल महत्त्वकांक्षा आणि प्रंचड आत्मविश्वास यांच्या जोरावर'पंरपरागत शेती,या प्रवाहाच्या विरोधात उभे राहतो, व तितक्याच तत्परतेने महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून या बळीराजाला विविध योजना, साह्य, मार्गदर्शन, मदत मिळते आणि यांच्याच जोरावर हा बर्फाचे गोळे विकणारा सर्वसामान्य माणूस तालुका, जिल्हा, राज्य पातळीवरील अनेक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार मिळवतो, इतकेच नव्हे तर राजधानी दिल्लीत होणाऱ्या ध्वजारोहण सोहळयास उपस्थित राहण्याचा मान मिळतो,ही ठाणे जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब असून ही यशोगाथा आहे, कल्याण तालुक्यातील'कोसले, या गावातील श्रीराम विठ्ठल पालवी या'जगाच्या पोशिंद्याची!

कल्याण तालुक्यातील कोसले या छोट्याशा ग्रामीण भागात विठ्ठल पालवी यांनी८एकर शेती, यामध्ये साडेतीन एकर (वरकस)माळरान, त्यामुळे केवळ पावसाळयात थोड्याशेतात भात लागवड व्हायची, ही अवस्था पाहून मुलगा श्रीराम याने शेतीकडे पाठ फिरवून उन्हाळयात बर्फाचे गोळे(कुल्फी)विक्री चालू केली,रोजचा ताजा पैसा मिळू लागला,परंतु अचानक वडिलांच्या मृत्यूमुळे संपूर्ण जबाबदारी श्रीरामाच्या खांद्यावर पडली, सुदैवाने त्याला महाराष्ट्र शासनाच्या तालुका कृषी विभाग तसेच जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाचे उत्तम सहकार्य, मार्गदर्शन मिळाले, या ज्ञानाचा चांगला उपयोग शेतीत केला, सेंद्रिय खत, शेणखत, गांडूळ खत, कोंबडी खतांच्या वापरावर भर दिला, पारंपरिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या शेतीला बगल देत शेतीत नवनवीन प्रयोग केले, अगदी भुईमूग, सुर्यफुल, भाताची पट्टा पद्धत, एस आर टी पद्धत, ड्रम सिडरने भात लागवड असे विविध प्रयोग केल्याने आज या शेतकऱ्यांला तालुका, जिल्हा, तसेच राज्य पातळीवरील आदर्श शेतकरी, शेतीनिष्ठ शेतकरी, असे विविध पुरस्कार राज्यपालांच्या हस्ते मिळाले आहेत, यामध्ये त्यांच्या पत्नीचा देखील सिहांचा वाटा आहे.तंत्रशुद्ध पद्धतीच्या शेतीचे श्रीराम पालवी हे 'आयडॉंल,बनले आहे.

नुकतीच कल्याण पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी, कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे, विस्तार अधिकारी सुनील संत, सुभाष आहेर, व पत्रकार संजय कांबळे यांनी शेतकऱ्यांच्या शेतात भेट दिली, कल्याण पंचायत समितीच्या कृषी विभागाने दिलेल्या विविध योजनांची पाहणी केली, यामध्ये विविध भात लागवड पद्धत, कडबा कुट्टी यंत्र, महिलांना व्यापारी छत्री, वजनकाटा, खुर्ची, टेबल, तसेच इतर साहित्याची पाहणी व प्रात्यक्षिके पाहिली, विविध योजनांची माहिति दिली, मार्गदर्शन केले.

याप्रसंगी शेतकरी श्रीराम पालवी, दिलीप पालवी, सरपंच, ग्रामपंचायत कोसले, गोपाल भोईर, गोविंद भोईर, जनार्दन भोईर,कविता पारधी, तनुजा गायकर, करिष्मा गायकर, अनंता भोईर, दीपक दिवाने, ज्ञानेश्वर चौधरी, लक्ष्मण भोईर, विलास पालवी, सुभाष भोईर, केदार भोईर, इत्यादी शेतकरी व महिला उपस्थित होत्या.

# पडघा येथील टोलनाका मोर्चाला नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद
## मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत टोलवसुली बंद ठेवण्याची आंदोलनकर्त्यांचीं मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : मुंबई नाशीक महामार्गावरील रस्त्याबाबत नागरीकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या सोडविण्यासाठी सर्वपक्षीय काढण्यात आलेल्या टोलनाका बंद आंदोलन व मोर्चाला नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.



पडघा टोल नाका रस्ता व लगतच सेवा रस्ते तात्काळ दुरुस्त करा, मुंबई नाशीक महामार्गावर आवश्यक तेथे अंडरपास करा, तळवली नाका येथील अंडरपास रस्त्याचे काम लवकर करा, विवीध गावाजवळ आवश्यक तेथे सेवा रस्ते तयार करा, सेवा रस्त्यालगत गटारी बांधुन पथदिवे पसवा, आवश्यक तेथे गतिरोधक बसवा, प्रसाधनगृहाची व्यवस्था करा, महामार्गावर अग्निशमन गाडी तैनात करा, पडघा कल्याण रस्त्यावरील खड्डे दूरूस्त करा आदी मागण्यांसाठी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर व मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वपक्षीय टोल बंद आंदोलन व मोर्चाचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते या मोर्चाची सुरूवात पडघा मुख्य प्रवेशद्वार ते टोल नाका पर्यंत करण्यात यावेळी "टोल नाका बंद करा" आमचे जिव घेणे बंद करा अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या या मोर्चाचे रूपांतर टोलनाक्याजवळ जाहीर सभेत झाले यावेळी शिवसेना (ठाकरे) जिल्हाप्रमुख कुंदन पाटील, शहापूर तालुकाप्रमुख बाळा धानके, मनसे जिल्हा ग्रामीण संघटक मदन आण्णा पाटील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) तालुकाध्यक्ष गणेश गुळवी, शिवसेना (ठाकरे) प्रवक्ते अविनाश गाढवे, यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली यावेळी सर्वांनीच भिवंडी ते शहापुर, कल्याण, वाडा, ठाणे रस्त्यावरील विविध समस्यांचा पाढा वाचुन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व टोल वसुली कंपनीच्या संगनमताने निष्पाप नागरीकांचे अपघातात बळी जात असल्याचा आरोप करण्यात आला.यावेळी उपस्थित प्रमुख वक्त्या व शिवसेना ठाकरे उपनेत्या ज्योतीताई ठाकरे यांनी सत्ताधारी हे नागरीकांचे जिव वाचवणारे नसुन जिव घेणारे आहेत असा घणाघात करून भिवंडी, वाडा रस्त्या वर उतरून स्वतः खड्डे भरणाऱ्या आमदारांची खिल्ली उडवत खड्डे भरणारा आमदार नको तर अधीकाऱ्यांवर वचक ठेवणारा आमदार हवा अशी टीका आपल्या भाषणात केली. यावेळी शिवसेना ठाकरे उपनेते विश्वास थळे, भिवंडी लोकसभा संपर्कप्रमूख साईनाथ तारे विधानसभा संपर्क प्रमुख हनुमान पाटील, राजेंद्र काबाडी मनसे प्रदेश उपाध्यक्ष डी. के. म्हात्रे, तालुकाध्यक्ष विकास जाधव, इरफान भुरे, मनोज गगे, कवीता भगत, फशीताई पाटील, शाम पारधी, संजय पटेल, संजय जाधव, नरेश शेलार, गुरूनाथ मते पडघा सरपंच रविंद्र विशे प्रभारी सरपंच नयना जाधव, संजय पाटील, राकेश वारघडे मनोज गुळवी भरत पाटील उपस्थीत होते. तसेच यावेळी तहसीलदार भिवंडी अभिजीत खोले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण चे प्रकल्प संचालक श्रीकांत ढगे हे आंदोलनकर्त्यांनां सामोरे गेले तेव्हा त्याच्यासमोर मागण्याचीं कैफियत मांडण्यात आली. मागण्या पुर्ण करण्याचे आश्वासन ढगे यांच्याकडून देण्यांत आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भगवान सांबरे यांनी तर सुत्रसंचालन अँड. संदीप जाधव यांनी केले. यावेळी टोल वसुली बंद ठेवण्यात आली होती.

**महत्वाचे**

**मोर्चात सर्वपक्षीय नागरीक मोठ्या संख्येने सहभागी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व टोल वसुली ठेकेदाराच्या भोंगळ कारभारामुळे १५ वर्षात शेकडो नागरीकांचे अपघातात बळी, स्थानिक आमदारांचा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीकाऱ्यांवर वचक नसल्याचा आरोप, मागण्या पूर्ण झाल्याशिवाय टोल वसुली सुरू करू नये आंदोलनातकर्त्यांची मागणी, खडवली फाटा येथील अपघातात मृत्यु मुखी पडलेल्या एकुलती एक मुलगी रिया परदेशी हीचे वडील किशोर परदेशी यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक श्रीकांत ढगे यांना 'आणखी किती बळी घेणार' असा जाब विचारून संर्वासमोर वाभाडे काढले, मागण्या पूर्ण न केल्यास आक्रमक पवित्रा घेण्याचा आंदोलनकर्त्यांचा इशारा**

### पाली जि.प.शाळा क्र.१
# आदर्श विद्यामंदिरातील तीन विद्यार्थी गुणवता यादीत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता





रत्नागिरी तालुक्यातील जि.प.आदर्श विद्यामंदिर पाली नं.१ शाळेतील विद्यार्थी दिक्षा महेंद्र मेस्त्री ही जिल्हा गुणवत्ता यादीत पाचवी व रत्नागिरी तालुक्यात प्रथम, हर्ष महेश धाडवे हा जिल्हा गुणवत्ता यादीत २६ वा तर रत्नागिरी तालुक्यात चौथा, सत्वशील सहदेव गुरव जिल्हा गुणवत्ता यादीत ११२ वा तर तालुक्यात ११ येऊन हे तीन विद्यार्थी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पाचवी मध्ये गुणवत्ताधारक झाले आहेत.

जि.प.च्या मराठी माध्यमाच्या ऐकाच शाळेतील या तीन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीसाठी निवड होण्याची ही पहिलीच वेळ आहे. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली होती, त्याचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे. यामध्ये जि.प.आदर्श विद्यामंदिर पाली नं. १ या शाळेतील ऐकाच वेळी तीन विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादीमध्ये निवड होण्याबरोबरच या अगोदर याच तिघांची जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झालेली असून त्यांच्या या यशामागे प्रशालेतील प्रमुख मार्गदर्शक शिक्षक मारुती घोरपडे हे आहेत. मुख्याध्यापक जनार्दन मोहिते, शिक्षक ममता सावंत, श्रद्धा रसाळ आदींचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे पालकमंत्री सामंत, आमदार किरण सामंत, कोकण विभागीय परीक्षा मंडळ सहसचिव प्रेरणा शिंदे, रत्नागिरी तालुका पं. स.गटशिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय सोपनूर आदींनी अभिनंदन केले आहे.

# पेण शहरातील रस्त्यावर जीवघेणे खड्डे जबाबदारी कोणाची ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण शहरात ठीक ठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून, वाहनचालकांचे जीव धोक्यात आले आहेत. पावसामुळे हे खड्डे पाण्याने भरल्याने दिसत नाहीत, परिणामी बाईकस्वार दिवसा व रात्रीच्या वेळी थेट खड्ड्यात आपटत असून अनेक अपघात घडत आहेत. विशेषतः पेण चिंचपाडा परिसर तसेच छत्रपती संभाजी महाराज ठिकाण पेण बायपास रस्ता या ठिकाणी पडलेले खड्डे जीवघेणे ठरत आहेत.

गेली सहा सात महिने पेण शहरांमध्ये रस्त्याचे काम सुरू असून एकही शहरातला रस्ता नीट झालेला दिसून येत नाही ठीक ठिकाणी अर्धवट ठेवलेली कामे अर्धवट असलेले रस्ते परिणामी मोठमोठे पडलेले खड्डे हे जीवघेणी ठरत आहेत हे नगरपालिका नागरिकांचा जीव घेण्यास तयार झाले आहे का असा आता प्रश्न पडलेला आहे. असे असतानाही रस्त्यावर इतक्या मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्या खड्ड्यांवरून नागरिक जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. पावसात हे खड्डे अधिकच धोकादायक झाले आहेत. याची जबाबदारी नेमकी कोण घेणार? असा सवाल संतप्त नागरिक उपस्थित करत आहेत. स्थानिक प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. झोपी गेलेले प्रशासन जागे होणार का? हे पाहणे गरजेचे आहे. अशा संतप्त प्रतिक्रिया पेण शहरातील ग्रामस्थांनी दिले आहेत.

### जीवनदीप महाविद्यालय खर्डीच्या अर्थशास्त्र विभागातर्फे
# युनेस्को जागतिक वारसा आणि अर्थकारणावर व्याख्यान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक १७ जुलै २०२५ रोजी "युनेस्को जागतिक वारसा आणि अर्थकारण" या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.



"महाराष्ट्र शासनाच्या प्रयत्नांतून छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत नुकतेच समाविष्ट झाले आहेत. हे केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर संपूर्ण भारतासाठी गौरवाचे क्षण आहेत. याच ऐतिहासिक घडामोडीच्या पार्श्वभूमीवर, अर्थशास्त्र विभागातर्फे 'युनेस्को जागतिक वारसा आणि अर्थकारण' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाद्वारे विद्यार्थ्यांना सांस्कृतिक वारशाचे जतन आणि त्याचा आर्थिक विकासावर होणारा सकारात्मक प्रभाव याची सखोल माहिती देण्यात आली."

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. रसिका सकपाळ यांनी विद्यार्थ्यांना जागतिक वारसाची संकल्पना, युनेस्कोची भूमिका, आणि वारसास्थळांमुळे होणारे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी महाराष्ट्रातील वारसास्थळांचे उदाहरण देत त्यांचा पर्यटन, रोजगार व विकास यामधील महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन प्रा. शरद खाकर यांनी केले. प्राचार्य प्रा. कैलास कळकटे यांनी ही विद्यार्थ्यांना अत्यंत मार्मिक शब्दात मार्गदर्शन केले.संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. रवींद्र घोडविंदे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक वर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली..


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in




## आजचे राशि भविष्य



**मेष**
जोखिम असलेले कार्ये टाळा. आरोग्य मध्यम राहील. जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील.

**वृषभ**
गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो.

**मिथुन**
पैसे मिळवण्याचा एखादा मार्ग आपल्या स्वतःच्या घरातून मिळू शकतो. अधिक जबाबदाऱ्या मिळण्याची शक्यता आहे आत्मसंयमाचा परिणाम इतरांवर होऊ शकेल.

**कर्क**
खेळत वेळ खर्च होईल. व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल.प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. आवश्यक कार्य पूर्ण होतील.

**सिंह**
अधिकार क्षेत्रात वाढ होईल.लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे. योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल.

**कन्या**
योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न करा. घरातील वातावरण आनंददायी राहील.

**तूळ**
दिवस आपल्यासाठी नवी सुरुवात करण्यास किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय ठरावण्यास साहाय्यक असू शकतो. आपण जीवनात हव्या असलेल्या वस्तूंवर लक्ष द्या.

**वृश्चिक**
मित्रांचा अनुकूल सहयोग मिळेल.आयुष्यात नातलागांची व मित्रांची चांगली भूमिका रहाणे शक्य आहे. व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा.

**धनु**
काही नवीन संधी मिळतील. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. आत्मविश्वास चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**मकर**
आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. ज्या व्यक्तीकडे फुकट घालवण्यासाठी वेळ आहे त्याचे ऐकण्याचा प्रयत्न करा.आपला सल्ला त्याला द्या.

**कुंभ**
पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करा.महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. हसत

**मीन**
आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे.प्रेमीजनांसाठी आजचा दिवस आनंदाने परिपूर्ण असेल.प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल.


जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
Admission Open 2025-2026
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# गुरुचरण शासकीय जागेवरील अनधिकृत बांधकामावर कारवाई



## विकासकावर गुन्हा दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महापालिका आयुक्त अभिनव गोयल,आणि उप आयुक्त समीर भूमकर यांच्या मार्गदर्शनाखाली,9/आय प्रभागातील गुरुचरण शासकीय जागेवरील अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई काल दिवसभरात करण्यात आली.

सदर कारवाईमध्ये शासकीय जलकुंभ बांधण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या २२ गुंठे जागेमध्ये अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या तीन खोल्या आणि कंपाउंड वॉल हटविण्यात आले. संबंधित विकासक जगदीश पाटील याच्यावर एमआरटीपी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे ही कारवाई सार्वजनिक हित लक्षात घेऊन पारदर्शकपणे राबविण्यात आली असून, जलसंचयन प्रकल्पासाठी मार्ग मोकळा झाला आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

# बेकायदा नळ जोडण्यांवर भिवंडी मनपाची कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : मौजे-कासारआळी, भंडारी गोडाउनचा बाजूला, कोंबडपाडा, भिवंडी येथे पाहणी केली असता त्या ठिकाणी असलेल्या नाल्यामधून महानगरपालिकेचा संगमपाडा येथील जलकुंभ भरण्याकरिता मुख्य जल वाहिनी गेलेली असून सदर मुख्य जल वाहिनीला रवी गायधर सिंह यांनी अनधिकृतपणे मनपाची रीतसर परवानगी न घेता जलवाहिनीला छिद्र पडून १"व्यासाचे २ नळ कनेक्शन नाल्यातून व कामवारी नदीतून ग्रामीण भागातील नेहा पार्क, मीठ पाडा येथील चाळीकरिता अनधिकृतपणे घेतल्याने जल वाहिनीचे नुकसान १" घरगुती रु.१२,०००/- प्रमाणे (१" घरगुती x २ कनेक्शन x ४ वर्षाचे) रु.९६,०००/- पाण्याची चोरी १" व्यासाचे प्रती वर्ष रु.१२,०००/- प्रमाणे ((१" घरगुती x २ कनेक्शन x ४ वर्षाचे) रु.९६,०००/- असे एकूण रु.१,९२,०००/- (अक्षरी रु. एक लक्ष ब्यान्नव हजार मात्र) नुकसान झाले असल्याने यांच्या विरुध्द निजमपुरा पोलिस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३२४(४)(५),३२६(क), ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा प्रशासक तथा आयुक्त सो, यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली उप अभियंता सरफराज अंसारी यांचे अधिपत्याखाली विराज भोईर, पथक प्रमुख यांचे मार्फत करण्यात आली.

# ठाणे महापालिकेचे सफाई कर्मचारी झाले सेवेत कायम

## महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: वारसा हक्काने ठाणे महापालिकेच्या सेवेत नियुक्त झालेल्या १५५ सफाई कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या सेवेत कायम करण्यात आले आहे. त्यासंदर्भातील नियुक्ती आदेश काढण्यात आले असून त्याबद्दल महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने जे सफाई कर्मचारी सेवानिवृत्त किंवा स्वेच्छानिवृत्त होतात त्यांच्या वारसांना महापालिकेच्या सेवेत नियुक्ती देण्यात येते. अशी नियुक्ती देण्यात आलेल्या सफाई कर्मचाऱ्यांची तीन वर्षांची सेवा पूर्ण झाल्यावर त्यांना महापालिकेच्या सेवेत कायम केले जाते. या संदर्भात, महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिलेल्या निर्देशानुसार आस्थापना विभागाने विशेष मोहिम राबवली.

या मोहिमेत सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी केल्यावर १५५ सफाई कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या सेवेत कायम करण्याचे आदेश टप्प्याटप्प्याने निर्गमित करण्यात आले. सफाई कामगारांना देय असलेले सर्व लाभ तत्काळ देण्याचे निर्देशही आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

महापालिका सेवेत कायम करण्याचा निर्णय झाल्याने या सफाई कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच, त्याबद्दल कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# भाजपा केमिस्ट फार्मासिस्ट प्रकोष्ठच्या वतीने राज्यभर सेवा सप्ताहाचे आयोजन

## - प्रदेश संयोजक श्रीकांत दुबे यांची माहिती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : भाजपा केमिस्ट फार्मसिस्ट प्रकोष्ट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने राज्यभर 22 जुलै पासून सेवा सप्ताह साजरा करणार असून तीन टप्प्यात हे कार्यक्रम होणार असल्याची माहिती राज्य प्रकोष्टचे प्रदेश संयोजक श्रीकांत दुबे, प्रदेश समन्वयक अजित पारख यांनी दिली.

अजित पारख यांनी सेवा सप्ताह च्या प्रयोजनाच्या माहिती साठी राज्यस्तरीय पदाधिकारी यांची सभा आयोजित केली होती. श्रीकांत दुबे यांनी राज्यभर घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची सर्व पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून माहिती दिली.

सेवा सप्ताहाचे तीन टप्पे करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात अनाथ आश्रम, वृद्धाश्रम दिव्यांग मुले यासह रक्तदानदान शिबिर व गरजू रुग्णांची आरोग्य तपासणी व औषधे वितरण करण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात वृक्षारोपण, शीत शव पेटीचे नियोजन, विकलांग मुलांनी बनविलेल्या वस्तूंकरिता बाजारपेठ उपलब्ध करून देणे. तर तिसऱ्या टप्प्यात आरोग्य क्षेत्राचा मुख्य कणा म्हणजे राज्यातिल फार्मासिस्टला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांची वेळ घेऊन भव्य रोजगार मेळावा पुणे किंवा मुंबई येथे आयोजित करण्यात येणार आहे. फार्मासिस्ट रोजगार मेळाव्याची संकल्पना विजय पाटील यांनी मांडली. पुणे किंवा मुंबई येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक व त्यांच्या परिवारासाठी विशेष आरोग्य सवलत व माफ़क दरात औषधे देण्याची संकल्पना मुकुंद दुबे यांनी मांडली. शासनाच्या योजना गरजवंता पर्यंत पोहोचवणे हे देखील प्रकोष्ठ चे उद्देश सेवा सप्ताहत राहणार आहे.

या सभेला मदन पाटील, सुनिल भंगाळे, अतुल अहिरे, दीपक कोठारी, गोपाल गांधी, निलेश वाणी यांनी आपले विचार मांडले. सेवा सप्ताह राज्यभर यशस्वी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला व त्याप्रमाणे सप्ताह नियोजना करिता राज्यातिल सर्व मंडळीची सभा आयोजित करण्याचे प्रदेशाध्यक्ष श्रीकांत दुबे यांनी सांगीतले.

# ह्याला जबाबदार कोण ?



कल्याण पश्चिम मधील एम जे स्कॅन सेन्टर जवळील पाइपलाईन फुटून गेले काही दिवस हजारो लिटर पाणी वाया जात आहे.



कल्याण शिळफाटा रोडवरील सनई बँक्वेट हॉल जवळील पंढरपूर चहा समोरच्या गटारावरील स्लॅब गायब झाल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही

# चिकणघरच्या रखडलेल्या म्हाडा पुनर्विकासावर विधानपरिषदेत लक्षवेधी !









### आमदार योगेश टिळेकर यांनी मांडला प्रश्न

### येत्या महिन्याभरात यासंदर्भात बैठक लावणार असल्याची कॅबिनेट मंत्री शंभूराज देसाई यांची माहिती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : "कल्याण पश्चिमेतील मौजे चिकणघर येथील शांतिदूत सोसायटीच्या रखडलेल्या पुनर्विकासाचा प्रश्न थेट विधान परिषदेत लक्षवेधीव्दारे उपस्थित करण्यात आला. विधान परिषद सदस्य योगेश टिळेकर यांनी हा मुद्दा उचलून धरत राज्य शासनाचे त्याकडे लक्ष वेधले.

कल्याण पश्चिमेतील चिकणघर येथील हा प्रकल्प टायकून्स अवंती प्रोजेक्ट एलएलपी विकासकाने हाती घेतला असून गेल्या 13 वर्षांपासून तो अर्धवट स्थितीत असल्याने त्यातील 184 रहिवाशांचे प्रचंड हाल सुरू असल्याची माहिती टिळेकर यांनी लक्षवेधीवर सभागृहात बोलताना दिली. तसेच हे १८४ रहिवासी गेल्या अनेक वर्षांपासून इतरत्र भाड्याने राहत असून तब्बल 46 महिन्यांपासून त्यांना विकासकाकडून भाड्याचे पैसेही देण्यात आलेले नाहीत. उलटपक्षी संबंधित विकासकाकडून संस्थेची मिळकत ताब्यात घेण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून कट रचला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून इमारत धोकादायक असल्याचे महानगरपालिकेकडून घोषित करून ती जमीनदोस्त करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. परिणामी इथल्या 184 रहिवाशांचे स्वतःचे हक्काचे छप्पर नसल्याने त्यांच्यावर कुटुंबासह रस्त्यावर येण्याची वेळ आली आहे. तर या विकासकाने कायद्याचे वेळोवेळी उलंघन केल्याचेही टिळेकर यांनी सभागृहात सांगत म्हाडा उपनिबंधकांनी अधिकारांचा गैरवापर करून विकासकावर कोणतीही कारवाई केली नसल्याचेही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले याशिवाय विकासकाशी केलेला करारनामा आणि त्याला दिलेले कुलमुखत्यार पत्र रद्द करण्याचा ठराव पारित करणे, कर्ज घेताना विकासकाने विश्वासात न घेता खोट्या कागदपत्रांच्या आधारे सभासदांची फसवणूक करून HDFC बँकेशी संगनमताने लोन घेणे, गृहनिर्माण संस्थेच्या कार्यकारिणीने यासंदर्भात रिझर्व बँकेकडे रीतसर तक्रार दाखल करूनही पोलिस पोलीस अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई केली नसल्याचे आमदार योगेश टिळेकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत या रहिवाशांना न्याय देण्याची मागणीही आमदार टिळेकर यांनी यावेळी केली. इतकेच नाही तर घर मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या 184 सभासदांपैकी आतापर्यंत 57 जणांचा मृत्यू झाला असल्याची धक्कादायक माहितीही त्यांनी यावेळी सभागृहाला दिली. दरम्यान या लक्षवेधीवर उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले की हा प्रकल्प पुढे गेला पाहिजे असे आमदार योगेश टिळेकर यांना आश्वस्त करू इच्छितो. तसेच एक महिन्याच्या आतमध्ये गृहनिर्माण संस्था सभासद, म्हाडा प्राधिकरण, विकासक, स्थानिक लोकप्रतिनिधी यांची बैठक लावण्यात येईल. या बैठकीमध्ये संबंधित विकासकाकडून सभासदांना थकीत भाडे कधी देणार आणि पुढच्या किती कालावधीत हा प्रकल्प पूर्ण करणार याबाबतचा लेखी कालावधी घेण्यात येईल. आणि निश्चितच या प्रकल्पाला लवकरात लवकर गती दिली जाईल असे आश्वासन मंत्री शंभूराज देसाई यांनी यावेळी सभागृहाला दिले आहे.

## नमस्ते योजनेअंतर्गत

# कामगारांनी आपली नोंदणी करुन घ्यावी

## - अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मलनि:सारण वाहिन्यांची सफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षा व पुनर्वसन यांसाठी भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय तसेच गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने NAMASTE (National Action for Mechanized Sanitation Ecosystem) योजना महापालिका क्षेत्रातही राबविली जाते. आता ही योजना घनकचरा व्यवस्थापन विभागात काम करणाऱ्या कचरा वेचक कर्मचाऱ्यांसाठी देखील राबविली जाणार असल्याने, या योजनेचे लाभ मिळण्यासाठी जास्तीत जास्त कामगारांनी आपली नाव नोंदणी करुन घ्यावी, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी आज केले. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली नागरीक तसेच या योजनेचे लाभार्थी यांच्यामध्ये जनजागृती होण्यासाठी महापालिकेच्या ऊंबर्डे प्रकल्पावर "NAMASTE दिवस " साजरा करण्यात आला ,यावेळी बोलताना अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी हे आवाहन केले.

या योजनेचे लाभ प्राप्त होण्यासाठी कोणती कागदपत्रे व कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती उपस्थितांना देतानाच सफाई कर्मचाऱ्यांनी महापालिकेने दिलेली संरक्षक साधने देखील आवर्जुन वापरावीत, असेही ते पुढे म्हणाले. यावेळी उपस्थित कचरा वेचक कर्मचाऱ्यांना "पीपीई कीट"चे वितरण करण्यात आले. यासमयी जनि/मनि विभागाचे कार्यकारी अभियंता घन:श्याम नवांगुळ, उप अभियंता अजित देसाई, सिटी कॉर्डिनेटर स्वाती कोरडे तसेच प्रकल्पावरील सुपरवायझर व कचरावेचक उपस्थित होते.या कार्यक्रमात सलाह फौंडेशनच्या लक्ष्मी नाईक,स्त्री मुक्ती संघटना आणि परिसर भगिनी विकास संघाच्या करुणा धेंडे यांनी उपस्थित कामगारांना मार्गदर्शन केले.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी साठी कल्याण डोंबिवली महानगरपालिके मार्फत स्वच्छता कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, हेल्थ चेकअप, विमा संरक्षण, सामाजिक सुरक्षा योजना आणि पुनर्वसनासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. NAMASTE अंतर्गत लाभार्थ्यांची नोंदणी, त्यांच्या कौशल्यविकासासाठी कार्यशाळा व सामाजिक सक्षमीकरणाच्या योजना राबविण्यात येत आहेत.

# आदिवासी आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही

## - आदिवासी विकास मंत्री अशोक उईके

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील आदिवासी आश्रम शाळेतील कोणत्याही कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही, अशी ग्वाही आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आज विधानपरिषदेत दिली.

सदस्य किरण सरनाईक यांनी आदिवासी आश्रम शाळेत 'काम नाही वेतन नाही' नियम लागू असल्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. याला उत्तर देताना मंत्री उईके बोलत होते. यावेळी सदस्य सर्वश्री जगन्नाथ अभ्यंकर, अमित गोरखे, सुधाकर आडबाले यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

'काम नाही वेतन नाही' हा निर्णय न्यायालयाच्या निर्णयानुसार घेण्यात आल्याचे सांगून मंत्री उईके म्हणाले की, राज्यातील सर्व शाळा आणि आश्रमशाळा यांची नियमावली एकच आहे. त्यामुळे सर्वच शाळांना हा नियम लागू होतो. शाळा बंद झाली किंवा तुकडी बंद झाली तर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याचे धोरण आहे. तसेच जिल्हा परिषद शाळा आणि आदिवासी विकास विभाग, समाज कल्याण विभागाच्या आश्रमशाळा यासाठी शिक्षक आणि कर्मचारी भरतीचे नियम आणि निकष वेगवेगळे आहेत. त्यामुळे आदिवासी आश्रमशाळेतील काम नाही वेतन नाही या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत विशेष बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री उईके यांनी सांगितले.

## बेकायदेशीर बाईक टॅक्सीमार्फत

# अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबई महानगरात ॲपच्या माध्यमातून बेकायदेशीरपणे बाईक टॅक्सीद्वारे अवैध प्रवासी वाहतूक होत असल्याच्या तक्रारी परिवहन विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. ही प्रवासी वाहतूक परिवहन विभागाची कुठलीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे करून शासनाची व प्रवाशांची फसवणूक करण्यात येत आहे.

मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ९३ मधील तरतुदीप्रमाणे समुच्चयांनी मोटार वाहन धोरणानुसार ॲप आधारित प्रवासी वाहतुकीसाठी परवानगी घेणे बंधनकारक आहे. सध्या अशा कंपन्यांकडून कुठल्याही करतो त्यांच्या पालन न करता विना परवानगी प्रवासी वाहतूक सुरू होती.

अशा बेकायदेशीरपणे चालविण्यात येणाऱ्या बाईक टॅक्सी विरोधात मुंबई महानगर प्रदेशातील परिवहन कार्यालय अंतर्गत २० वायुवेग पथकांमार्फत एकाच वेळी मुंबई, ठाणे, वसई, वाशी, पनवेल येथे संयुक्त कारवाई मोहीम राबवली. या मोहिमेमध्ये अवैधरीच्या चालणाऱ्या ९३ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून ८५ वाहने (बाईक टॅक्सी) अटकावून ठेवण्यात आली आहेत. तसेच अवैध ॲग्रीकेटर विरुद्ध फौजदारी गुन्हे नोंदविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, असे अप्पर परिवहन आयुक्त यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# ठाणे जिल्ह्यातील हातभट्टीवर धाडसत्र । ९.१६ लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : ठाणे जिल्ह्यातील अंजूरगाव व आलीमघर खाडीमध्ये अवैध हातभट्टी केंद्र नष्ट करण्यासाठी हातभट्टी केंद्रावर धाडसत्र राबवून धडक कारवाई करण्यात आली. पावसाचा फायदा घेत या खाडीत अवैध हातभट्टी मद्य निर्मितीत वाढ झाली होती. त्याअनुषंगाने उत्पादन शुल्कच्या प्रशिक्षित जवानांनी बोटीने जावून सर्व हातभट्टी मद्य निर्मिती ठिकाणे १५ जुलै रोजी नष्ट केली. या कारवाईत एकूण ९ लाख १६ हजार १०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कायदा १९४९ अंतर्गत ०३ गुन्हे नोंद करण्यात आले.

ठाणे जिल्ह्यामध्ये सामूहिक मोहिम राबवून केलेल्या कारवाईत २०० लिटर क्षमतेचे १७८ ड्रम व १००० ली. क्षमतेचे ३ बॉयलर त्यामध्ये ३३ हजार ६०० लीटर रसायन व ३५ ली. गावठी दारु, इतर हातभट्टी साहित्य जप्त करण्यात आले. यावेळी काही मुद्देमाल नाशवंत असल्याने तो जागीच नष्ट करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ राजेंद्र देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण विभागाचे विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार यांच्या आदेशान्वये ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये उप अधीक्षक वैभव वैद्य, दुय्यम निरीक्षक एच. एम. देवकाते, सहा. दुय्यम निरीक्षक रणजीत आडे, तसेच जवान संदिप धुमाळ, अविनाश जाधव, रामचंद्र पाटील, राजु राठोड, भाऊसाहेब कराड, नारायण जानकर, विनोद अहिरे, प्रविण धवणे, रुपेश खेमनार यांचा सहभाग होता.

हातभट्टी दारु, अवैध मद्य निर्मिती केंद्रांवर राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे विभागाची धाडसत्र मोहिम राबविण्यात येत आहे. नागरिकांना अशा अवैध धंदयांबाबत तक्रार करायची असल्यास त्यांनी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ वर संपर्क साधू शकतात, असे आवाहनही राज्य उत्पादन शुल्क विभागाने केले आहे.



ठाणे • शुक्रवार•
१८ जुलै २०२५
पान ४
दैनिक जीवनदीप वार्ता



# मुलांची काळजी आणि संरक्षण उपायाबाबत प्रशिक्षण कार्यशाळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रायगड अलिबाग अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष या कार्यालयास आयुक्तालयामार्फत बालकांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या यंत्रणांचे बालकांच्या कायद्याबाबतची अंमलबजावणी व्हावी यासाठी बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम 2015 सुधारीत 2021 व लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम 2012, बालमजुरी, बालविवाह तसेच बालकांना उपेक्षा, हिंसा, अन्याय आणि शोषण ह्या परिस्थितीला बळी पडावे लागते. त्यासाठी प्रतिबंधात्मक उपायाबाबत प्रशिक्षण कार्यशाळा (दि. 16 जुलै ) रोजी संपन्न झाली. या प्रशिक्षण कार्यशाळेस प्रशिक्षणार्थीना सचिव विधी सेवा प्राधिकरण अलिबाग रायगड श्रीमती तेजस्विनी निराळे यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण कार्यशाळेत जिल्हा महिला बालविकास अधिकारी श्रीमती सुहिता ओव्हाळ, पोलीस निरीक्षक, विशेष बाल पोलीस अधिकारी श्रीमती सरिता चव्हाण तसेच जिल्ह्यातील सर्व विशेष बाल पोलीस पथक, प्रत्येक पोलीस स्टेशन मधील दोन असे एकूण 85 अधिकारी/कर्मचारी, बाल कल्याण समिती अध्यक्ष/सदस्य, बाल न्याय मंडळ सदस्य, जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, संरक्षण अधिकारी सर्व, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइड हेल्पलाइन, सखी वन स्टॉप सेंटर, समुपदेशन केंद्र उपस्थित होते.

# वैंयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज करा

## पशुसंवर्धन विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन








दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : पशुसंवर्धन पंचायत समिती मुरबाड यांच्या कडून व जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी आवाहन करण्यात येत असून नोंदणीकृत तबेला परवाना धारकांना गायी/म्हशी करिता रबर मेट,/दुध काढण्याचे यंत्र /कडबाकुट्टी वाटप करणे, तसेच 50%अनुदानावर एक दुधाळ गाय /म्हैस वाटप करणे, याजबरोबर 50%अनुदानावर(5+1) अशा स्थानिक जातीच्या शेळया वाटप करणे या योजनांसाठी आनलाईन पद्धतीने लाभार्थी निवड प्रक्रिया सन 2025 -26 या वर्षा करिता राबविली जाणार आहे.

तालुक्यातील पशुपालक, शेतकरी,सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती व महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात येत आहे. अर्ज करण्याचा कालावधी 14/07 ते 14/08/2025 असा निश्चित करण्यात आला आहे.यासाठी पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती मुरबाड यांच्याशी संपर्क साधावा.

> पशुसंवर्धन पंचायत समिती मुरबाड व जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत शेतकऱ्यांना विविध वैंयक्तिक लाभाच्या योजनांसाठी आनलाईन पद्धतीने अर्ज करावयाचे आहेत.तरी तालुक्यातील शेतकरी , पशुपालक, सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी, महिलांनी या योजनांचा आवश्य लाभ घ्यावा व अडचण आल्यास मला संपर्क साधावा- संतोष बबन पवार, प्र.अध्यक्ष खरेदी विक्री संघ मुरबाड तालुका

# मुरबाड पंचायत समितीच्या जागेवरील अतिक्रमण हटवणार का ?

## भूमी अभिलेख विभागाकडून जागेची हद्द निश्चित!




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : साजई ग्रामपंचायत हद्दीतील मडके पाडा येथे सर्वे नंबर 133 व 150 या क्षेत्रामध्ये मुरबाड पंचायत समितीच्या मालकीची जागा आहे. तशी महसुली दप्तरी 7/12 बारा मध्ये नोंद आहे. या बाबत अनभिज्ञ असलेल्या मुरबाड पंचायत समितिच्या या जागेवर सर्वे नं.133 मध्ये अनधिकृत बांधकाम झाल्याचि तक्रार अन्याय अत्याचार निमुर्लन समितीचे आण्णा मोतिराम साळवे यांनी केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने मुरबाड पंचायत समितीने दखल घेत काही दिवसापुर्वी या जागेची भूमिअभिलेख कार्यालयाद्वारे शासकीय मोजणी केली .तदनंतर दि.15 जुलै 2025 रोजी पुन्हा गटविकास अधिकारी व अन्य अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत या जागेची सिमा निश्चित करण्यात आली. या सिमा निश्चितिमध्ये मुरबाड नगरपंचायतीचे विद्यमान नगराध्यक्ष संतोष (बाबु)चौधरी यांनी अतिक्रमण केले आहे व त्यांच्या मालकिचे आर.सि.सि.बांधकाम केलेले घर व चालिचे बांधकाम झाले असल्याचा आरोप आण्णा साळवे यांनी केला होता . हा आरोप आता या मोजणी मधून सिद्ध होत असून झालेल्या अनधिकृत बांधकामावर मुरबाड पंचायत समिती काय कारवाई करते याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

> सध्या मडकेपाडा येथिल जागेची मोजणी झालेली आहे. मोजणी नकाशा व अहवाल प्राप्त झाल्यावर संबधित अतिक्रमण केलेल्यांना सुनावणीची एक संधी दिली जाईल व तदनंतर योग्य ती उचित कारवाई केली जाईल
> – रोहन घुगे,मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद ठाणे

दरम्यान मुरबाड पंचायत समितीच्या जागेत बांधकाम होत असताना पंचायत समितीचे प्रशासन काय करत होते . याजबरोबर जागा शासनाचि असताना बांधलेल्या घराची घरपट्टी, असेसमेंट उतारा , कर आकारणि साजई ग्रामपंचायतने केली कशी ,शिवाय आर.सि.सि बांधकाम करताना जागेचा अकृषिक परवाना घेतला आहे का ? या सर्वांचि चौकशी झाली पाहिजे अशी मागणी होत असून सदर अनधिकृत बांधकाम मुरबाड पंचायत समितीने पाडले नाही तर उपोषणाचा ईशारा तक्रारदार आण्णा साळवे यांनी प्रशासनाला दिला असून आज त्यांनी कारवाईसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांना लेखि निवेदन सुद्धा दिले आहे.

प.पू.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर(तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



आयुष्यात अत्यंत यशस्वी व मोठ्या असणाऱ्या प्रत्येक व्यक्ती त्यांच्या गुरुच्या मार्गदर्शनाखाली, त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून, पुढे जात मोठ्या होतात. अगदी एकलव्याचेच उदाहरण घ्या. गुरुने त्याला नाकारले तरी त्याने सरावाच्या वेळी आपल्या गुरुंचा पुतळा उभा करून धनुर्विद्येचा अभ्यास केला. या मागचा भावार्थ असा, आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अथक परिश्रम तर हवेच पण त्याला श्रद्धेची, विश्वासाची जोडही हवी. हा विश्वास, श्रद्धा आपल्याला गुरुत दिसते. त्याच्याकडून आपल्याला प्रेरणा मिळते. ही प्रेरणा देणारी व्यक्ती आपला गुरुच आहे.

गुरूमाऊली - प.पू.स. अलोकनाथजी महाराज

# पडघ्यातील चिंतामणी हॉस्पिटलला आ. राजन साळवी यांची भेट



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : ग्रामीण भागातील नागरीकांना आरोग्य सेवा देण्यासाठी अग्रेसर असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील चिंतामणी हॉस्पिटलला आमदार राजन साळवी यांनी भेट देऊन विविध विभागाची माहीती घेतली.

पडघा परिसरातील सामान्य कुंटुबातील होतकरू तरुण मयुर मधुकर दुबेले, इरफान शेख व त्यांचे इतर सहकारी ग्रामीणमधील नागरीकांसाठी मल्टीस्पेशालीटी अँण्ड ट्रॉमा युनीट कार्यरत असलेले चिंतामणी हॉस्पिटल चालवीत असल्याची माहिती कोकणातील राजापुर (रत्नागिरी) विधानसभा मतदारसंघाचे आमदार व शिवसेना उपनेते राजन साळवी यांना मिळताच त्यांनी चिंतामणी हॉस्पिटलला बुधवारी भेट देत हॉस्पिटल मधील सुसज्ज अशा कै. सिताबाई नकुल पाटील मोफत डायलेसीस कक्ष, आयसीयू, शस्त्रक्रिया विभाग, जनरल वार्ड, आदी विभागाची पाहणी करून माहीती घेतली तसेच ग्रामीणमधील नागरीक, आदीवासींसाठी, सुसज्ज हॉस्पिटल चालवीत आहेत व शासनाच्या विविध योजनांद्वारे नागरीकांवर उपचार करीत असल्याबद्दल माऊली सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष व चिंतामणी हॉस्पिटलचे संचालक मयुर दुबेले, इरफान शेख व त्यांचे सर्व डॉक्टर, कर्मचारी यांचे आमदार साळवी यांनी कौतुक केले. तसेच यावेळी हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने आमदार साळवी यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. व त्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करुन विठ्ठल रुक्मिणीची मुर्ती भेट देण्यात आली. यावेळी त्यांच्या सोबत माजी उपजिल्हाप्रमुख राजेंद्र शिंदे हिन्दुस्थान कामगार सेना अध्यक्ष समीर पिंपळे संगमेश्वर संपर्कप्रमूख राजेश शेलार,स्वीय सहाय्यक संदेश मितारी, सुहास नारकर, युवा सेना पदाधिकारी सचीन झोरे शाखाप्रमुख अनिकत सांवत उपस्थित होते.

# मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी ‘महाडीबीटी’वर अर्ज प्रक्रिया सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता महाडीबीटी प्रणालीवरून नवीन तसेच नुतनीकरण मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्जाची ऑनलाईन स्वीकृती १ जुलै २०२५ पासून सुरू झाली आहे. मुंबई उपनगर अधिनस्त सर्व महाविद्यालयांनी नोंदणीकृत अर्ज तत्काळ ऑनलाईन मंजूर करावेत, असे आवाहन मुंबई उपनगरचे सहायक आयुक्त रविकिरण पाटील यांनी केले आहे.

दरवर्षीप्रमाणे, नोंदणीकृत झालेल्या अर्जांपैकी नुतनीकरण अर्जांचे प्रमाण नवीन अर्जांच्या तुलनेत जास्त असते. त्यामुळे सर्व महाविद्यालयांनी प्रथम प्राधान्याने नुतनीकरण अर्जांची पडताळणी करून ते ऑनलाईन मंजूर करावेत व मुंबई उपनगरचे सहाय्यक आयुक्त यांच्या लॉगिनवर तत्काळ पाठवावेत.

त्याचबरोबर भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना तसेच शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतीपूर्ती योजनेच्या लाभापासून अनुसूचित जाती या प्रवर्गातील विद्यार्थी वंचित राहणार नाहीत याची दक्षता महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी घ्यावी, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

# खुशबू ठाकरे मृत्यूप्रकरण

## तहसीलदारांच्या लेखी आश्वासनानंतर ठिय्या आंदोलन स्थगित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील वरवणे आदिवासी आश्रमशाळेत चौथीत शिकणारी खुशबू ठाकरे हिचा मृत्यू चुकीच्या वैद्यकीय उपचारांमुळे २२ जानेवारी २०२५ रोजी झाला. सहा महिने उलटून गेले तरी दोषींवर कोणतीही कारवाई झाली नसल्याने ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेने ठिय्या आंदोलन सुरू केले. तहसीलदारांच्या लेखी हमीमुळे आंदोलन १५ ऑगस्टपर्यंत स्थगित करण्यात आले आहे.

१६ डिसेंबर २०२४ रोजी खुशबूच्या अंगावर दिसलेल्या चट्ट्यांवरून कुष्ठरोगाचा संशय घेतला गेला. मात्र कोणताही ठोस निदान न करता तिच्यावर थेट कुष्ठरोगावरील उपचार सुरू करण्यात आले. यामुळे तिची प्रकृती ढासळली व २२ जानेवारी रोजी एमजीएम रुग्णालयात तिचा मृत्यू झाला. चौकशी समितीचा अहवाल २७ फेब्रुवारी रोजी पोलिसांऐवजी थेट राज्य शासनाकडे दिला गेला, यावरून प्रकरण दडपण्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. या आंदोलनात खुशबूचे पालक,



ग्रामस्थ व अनेक सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांनी १५ ऑगस्टपर्यंत मागण्या पूर्ण न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे यांच्या प्रमुख मागण्या म्हणजेच खुशबूच्या मृत्यूचा चौकशी अहवाल पोलिसांना सादर करून तो सार्वजनिक करावा.केमिकल ॲनालिसिस रिपोर्ट सार्वजनिक करावा.दोषींवर गुन्हा दाखल करून आरोपपत्र न्यायालयात सादर करावे.जिल्हा आरोग्य अधिकारी श्रीमती विखे यांचा जबाब ग्राह्य धरू नये. जबाबदारी झटकणाऱ्या अधिकाऱ्यांना पदावरून मुक्त करावे.

पालकांना 10 लाख रुपयांची नुकसानभरपाई द्यावी अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

# शाडू मातीच्या मूर्ती आता होणार ‘ऑनलाइन’ उपलब्ध

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी पालिकेचे विशेष प्रयत्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : यंदा मुंबईत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने शाडू ठोकला आहे. आतापर्यंत पालिकेच्या वतीने मूर्तिकारांना शाडू मातीचा पुरवठा केला जात असतानाच, आता पालिका शाडू मातीच्या मूर्ती ऑनलाइन व्यासपीठावर उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नात आहे. यासाठी पालिका प्रशासनाने ई-कॉमर्स कंपन्यांशी संपर्क साधला असून त्यांच्यासोबत पत्रव्यवहारदेखील केला आहे. या पत्रव्यवहाराला समोरून प्रतिसाद आल्यावर पालिकेची ही योजना यावर्षापासून अंमलात येईल. असा विश्वास पालिका सूत्रांनी व्यक्त केला.

बी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडाळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा, यासाठी मुंबई महानगरपालिकेने कंबर कसली आहे. मूर्तिकारांना मंडपांसाठी ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ या तत्त्वावर जागा आणि मूर्ती साकारण्यासाठी शाडू माती मोफत पुरवित आहे. या सुविधांचा वापर करून मुंबईतील मूर्तिकारांना जास्तीत जास्त पर्यावरणपूरक मूर्ती तयार करून यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी पालिका प्रयत्न करत आहे. त्यानुसार २०२४ साली सुमारे ६० हजारहून अधिक गणेश मूर्ती शाडू मातीपासून बनवल्या होत्या. परंतु यंदा गणेशोत्सव २०२५ पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी मुंबई महानगरपालिका मूर्तिकारांना मंडपाकरिता मोफत जागा पुरवित आहे. तसेच, पालिकेच्या वतीने आतापर्यंत ८३० टन शाडू मातीचा पुरवठा मूर्तिकारांना करण्यात आला आहे. महापालिकेच्या वतीने प्रत्येक परिमंडळांमध्ये माती खरेदीसाठी प्रत्येकी २० लाख रुपयांची आर्थिक तरतूद केलेली आहे, त्यातून या शाडू माती खरेदी करून प्रत्येक परिमंडळांमधील वॉर्डांना पुरवठा केला जात आहे.

दरम्यान, यंदाच्या वर्षात भाविकानी शाडू मातीच्या मूर्तींना अधिक पसंती द्यावी. आणि पर्यावरणीय प्रदूषण टाळण्यासाठी हातभार लावावा. यासाठी पालिका मूर्तिकारांना ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नात आहे. जेणेकरून भाविकांना कमी कालावधीतही बाप्पाची शाडू मातीची मूर्ती घरापर्यंत उपलब्ध होईल. यासाठी भाविकांना किमान १५ दिवस आधी गणपती बाप्पाची मूर्ती बुक करावी लागणार आहे.

### या व्यासपीठावर उपलब्ध होऊ शकते मूर्ती

स्विगी इन्स्टामार्ट, ब्लिंकिट, झोमॅटो, झेप्टो, फ्लिपकार्ट, ॲमेझॉन, जिओमार्ट आणि बिग बास्केट.

### मूर्तीचे दर आणि उंची चर्चेनंतर ठरणार

पालिकेने ई-कॉमर्स कंपनीशी पत्रव्यवहार केला असून येत्या आठवड्यात त्यांच्याकडून प्रतिसाद येणे अपेक्षित आहे. त्यानंतर त्यांच्याशी आणि मूर्तिकारांशी चर्चा करून शाडू मातीच्या मूर्तीचे दर ठरवण्यात येतील. तसेच, या दरम्यान, मूर्तीची उंची साधारण किती असावी याबाबत चर्चा होणार आहे, अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

## प्रोत्साहन बक्षीस योजने अंतर्गत

# आत्मा मालिक शाळेच्या विद्यार्थ्यांचा धनादेश देऊन सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात राबवण्यात येणाऱ्या प्रोत्साहन बक्षीस योजनेत अघई येथील आत्मा मालिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांना रक्कमेचा धनादेश देऊन सत्कार करण्यात आला.

मुंबई विभागात एस.एस.सी (शालांत परीक्षामध्ये) सन 2023 -24 या शैक्षणिक वर्षात शहापूर येथील विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट (कोकमठाण) संचलित, आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुल मोहिली - अघई, या आत्मा मालिक इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी प्रतीक दिनेश बोस यांनी 93 टक्के तर तेजस सुनील थापड याने 90 टक्के गुण मिळवून मुंबई विभागात नामांकित शासकीय योजनेतील स्कूल (इंग्रजी आणि मराठी माध्यमातील) मध्ये प्रथम, द्वितीय क्रमांक पटकावले होते.

यामध्ये प्रतिक बोस यास पस्तीस हजार रुपये धनादेश तर तेजस थापड यास पंचवीस हजार रुपये रक्कम धनादेश देऊन विशेष सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष उमेशजी जाधव, संत भारतमाता, सचिव अनंत गायकवाड, सदस्य प्रवीण मोरे , सामान्य प्रशासन व्यवस्थापक उल्हास पाटील, एच् आर् विभाग व्यवस्थापक राहुल जाधव, दत्तात्रेय तेलोरे, शालेय व्यवस्थापिका श्रीलथा नायर, स्टेट बोर्डाच्या प्राचार्या पौर्णिमा उपासनी, प्राचार्य कैलास थोरात आदी शिक्षकवृंद यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, समस्त विश्वस्त मंडळ यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर आज ठाणे जिल्हा दौऱ्यावर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर या दि.18 जुलै 2025 रोजी ठाणे जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळापासून संरक्षण प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम 2013 या कायद्यांतर्गत शासकीय / निमशासकीय कार्यालयात गठीत अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (IC) अध्यक्ष / सदस्य यांच्यासाठी मा.राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांच्या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेस राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर या जिल्हा नियोजन भवन, पहिला मजला, समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे येथे सकाळी 11.00 वाजता उपस्थित राहणार आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४१११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

*Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*